# जिल्हाधिकारी कार्यालय, जळगांव

(कुळकायदा शाखा)

दुरध्वनी क्र.०२५७-२२२०१५ Email ID - tenancy.jalgaon११@gmail.com फॅक्स नं. ०२५७-२२२०५००

क्र.कुळका/१/ई-टपाल/२०२३/३६/१०२९२ दिनांक : --/०३/२०२३ 05/06

प्रति

तहसिलदार जळगाव, जामनेर, भुसावळ, मुक्ताईनगर, बोदवड, यावल, रावेर, एंरडोल, पारोळा, धरणगांव, अमळनेर,चोपडा,पाचोरा,भडगाव,चाळीसगांव

विषय :- महाराष्ट्र शासनाकडून जळगांव जिल्हा सहकारी कृषि ग्रामीण बहुउद्देशिय विकास बँकेच्या (भू-विकास बँक) कर्ज घेतलेल्या शेतकऱ्यांना संपुर्ण कर्जमाफी करण्यात आल्यामुळे शेतकऱ्यांच्या सातबारा उताऱ्यावरील कर्जाच्या बोजाची नोंद कमी करणेबाबत.

1630

संदर्भ :-1.अवसायक तथा जिल्हा निबंधक सहकारी संस्था जळगाव यांचे कडिल प.‍त्र जा.क्र.शासन निर्णय/बोजा कमी/2023/41 दि.09/03/2023

12/04/2023

2.महाराष्ट्र शासनाचे सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाकडील शासन निर्णय क्र. एलडीबी-२०१५/प्रक्र २८ (शिकाना)/ ७-स मंत्रालय मुंबई दिनांक ९ नोव्हेंबर २०२२.

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये कळविण्यात येते की, अवसायक तथा जिल्हा निबंधक सहकारी संस्था जळगाव यांचे कडिल संदर्भिय पत्र यासोबत जोडून पाठविलेले आहे.

संदर्भिय पत्रानूसार व शासन निर्णय ९ नोव्हेंबर २०२२ अन्वये,महाराष्ट्र शासनाकडून जळगांव जिल्हा सहकारी कृषि ग्रामीण बहुउद्देशिय विकास बँकेच्या (भू-विकास बँक) कर्ज घेतलेल्या शेतकऱ्यांना संपुर्ण कर्जमाफी करण्यात आल्यामुळे शेतकऱ्यांच्या सातबारा उताऱ्यावरील कर्जाच्या बोजाच्या नोंदी कमी करण्याबाबत तलाठी व मंडळ अधिकारी यांना कार्यवाही करण्याबाबत आपलेस्तरावरुन कळविण्यात यावे.व त्याबाबतचा अहवाल इकडेस सादर करावा.

(शुभांगी भारदे)
**उपजिल्हाधिकारी (महसूल प्रशासन)**
**जिल्हाधिकारी कार्यालय जळगांव**

प्रत:- अवसायक तथा जिल्हा निबंधक सहकारी संस्था जळगाव यांचेकडेस माहीतीसाठी

3095

क्र./~~जमीन~~ /कावि/ 63/ 23

तहसिलदार यांचे कार्यालय,

जा.क्र. दि. / /2023

प्रति,

~~[illegible]~~ सर्व

मंडळ अधिकारी

२/- [illegible] पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

तहसिलदार, रावेर 3/5

O/C

# जळगांव जिल्हा सह.कृषि ग्रामीण बहुउद्देशिय विकास बँक मर्या. जळगांव
## मुख्य कार्यालय जळगांव (अवसायनात)

बळीराम पेठ, सिटी सर्व्हे नं.२२११/२ जळगांव जिल्हा जळगांव ४२५००१

जा.क्रं./शासन निर्णय/बोजा कमी/२०२३/ ४१ दिनांक ९ /०३/२०२३

प्रति,

**मा.जिल्हाधिकारी साहेब,**
जिल्हाधिकारी कार्यालय जळगांव

**विषय :- महाराष्ट्र शासनाकडून जळगांव जिल्हा सहकारी कृषि ग्रामीण बहुउद्देशिय विकास बँकेच्या (भू-विकास बँक) कर्ज घेतलेल्या शेतकऱ्यांना संपुर्ण कर्जमाफी करण्यात आल्यामुळे शेतकऱ्यांच्या सातबारा उताऱ्यावरील कर्जाच्या बोजाची नोंद कमी करणेबाबत.**

**संदर्भ :-** महाराष्ट्र शासनाचे सहकार,पणन व वस्त्रोद्योग विभागाकडील शासन निर्णय क्र.एलडीबी-१०१५/प्र.क्र.२८ (शिकाना)/७-स मंत्रालय मुंबई दिनांक ९ नोव्हेंबर २०२२.

महोदय,

उपरोक्त संदर्भिय शासन निर्णयाचे अवलोकन व्हावे.

उक्त शासन निर्णयान्वये राज्यातील भुविकास बँकांबाबत धोरणात्मक निर्णय घेण्यात आला असून राज्यातील भुविकास बँकांच्या कर्जदारांकडील संपुर्ण कर्जाची रक्कम माफ करण्यात आली आहे. त्या बाबतच्या संदर्भिय शासन निर्णयामधिल **'अ'** कर्जमाफी मध्ये खालील प्रमाणे नमुद आहे.

अ) कर्जमाफी :-

१) सद्यस्थितीत राज्यातील २९ जिल्हा भुविकास बँकांकडील ३४७८८ कर्जदारांचे थकीत कर्जाची रक्कम (व्याजासह) सुमारे ९६४.१५ कोटी इतकी आहे.सदर संपुर्ण कर्जाची रक्कम (व्याजासह) माफ करण्यात येत आहे. त्यानुसार सर्व जिल्हा भुविकास बँकांनी त्यांचाकडील कर्जाच्या रक्कमा या बँकांकडून शासनास येणे असलेल्या रक्कमेत समायोजित कराव्यात.

२) सदर कर्जाचे बोजे ज्या थकबाकीदार शेतकऱ्यांच्या जमिनीवर आहेत त्या जमिनीवरील सदर बोजे कमी करण्याबाबत महसुल विभागाशी समन्वय साधुन पुढील कार्यवाही संबंधित जिल्हा भुविकास बँकांच्या अवसायकांनी तातडीने करावी.

उक्त शासन निर्णयान्वये जळगांव जिल्हा भुविकास बँकेकडील २२७ कर्जदारांचे संपुर्ण कर्ज रक्कम रु.७००.६४ लाख माफ करण्यात आली आहे.त्यामुळे मागील काळात बँकेने शेतकऱ्यांना जमिन तारणात घेऊन विविध कारणांसाठी वाटप केलेले संपुर्ण कर्ज माफ झालेले असल्यामुळे जळगांव जिल्हयातील कोणत्याही शेतकऱ्यांकडे भुविकास बँकेचे कर्ज बाकी येणे राहीलेले नाही.

जळगांव जिल्हा भुविकास बँकेचे कर्जवाटप सन १९९८ व त्यापुर्विचे असून शेतकऱ्यांच्या सातबारा उताऱ्यावर मालकी हक्क सदरी कर्जाच्या बोजाची नोंद घेतांना बँकेच्या तत्कालीन नावाने घेण्यात आलेली आहे. **नावे की,**

५/३/२३
महसूल सहाय्यक / अव्वल कारकून
टपाल शाखा
जिल्हाधिकारी कार्यालय, जळगांव.

**१.पुर्व खान्देश भुविकास बँक,**

**२.भुविकास बँक,**

**३.लॅंड डेव्हलपमेंट बँक,**

**४.महाराष्ट्र राज्य सहकारी कृषि व ग्रामीण विकास बँक लि.मुंबई जिल्हा शाखा जळगांव,**

**५.जळगांव जिल्हा सहकारी कृषि ग्रामीण बहुउद्देशिय विकास बँक मर्या.जळगांव**

वरील प्रमाणे नोंद घेण्यात आलेली आहे.तसेच २५ वर्ष व त्यापुर्वि तारणात घेतलेल्या जमिनीच्या मालकी मध्ये बदल झालेले असुन सर्वेनंबर बदलून त्याचे गट नंबर झालेले आहे.

तरी शासन निर्णयानुसार जळगांव जिल्हा भुविकास बँकेच्या शेतकरी कर्जदारांची संपुर्ण कर्जमाफी करण्यात आली असल्यामुळे सदर शेतकऱ्यांना इतर बँकांकडून नविन कर्ज उपलब्ध होणेसाठी जळगांव जिल्हयातील शेतकऱ्यांच्या सातबारा उताऱ्यावरील भुविकास बँकेच्या कर्ज बोजाची नोंद तातडीने कमी करुन देण्यासाठी आपल्या स्तरावरुन जिल्हयातील सर्व तहसिल कार्यालय, मंडळ अधिकारी व तलाठी यांना आदेश व्हावे ही सविनय विनंती आहे.

सोबत :- १. शासन निर्णय दि.९.११.२०२२.
२. शासन निर्णय दि.२४.७.२०१५

आपला विश्वासू

(संतोष बिडवई)
अवसायक
तथा जिल्हा उपनिबंधक
सहकारी संस्था जळगांव

प्रत पुढील कार्यवाही साठी :
१. मा.उपविभागीय अधिकारी,उपविभाग -------------
२. मा.तहसिलदार,तहसिल कार्यालय ता.-------------
यांना देऊन विनंती की, उक्त शासन निर्णयानुसार शेतकऱ्यांच्या सातबारा उताऱ्यावरील **भुविकास बँकेच्या** कर्ज बोजाची नोंद तातडीने कमी करुन देण्यासाठी योग्य ती कार्यवाही करावी.

प्रत माहीतीसाठी सविनय सादर
१) मा.सहकार आयुक्त व निबंधक सो.सह.संस्था,म.रा.पुणे.
२) मा.अवसायक सो.म.रा.सह.कृषि ग्रा.बहु.वि.बँक म.मुंबई.
३) मा.विभागीय सहनिबंधक सो.सह.संस्था नाशिक वि.नाशिक
४) मा.जिल्हा उपनिबंधक सो.सह.संस्था जळगांव

अवसायक
तथा जिल्हा उपनिबंधक
सहकारी संस्था जळगांव

महाराष्ट्र राज्य सहकारी कृषी ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँक मर्या., मुंबई (शिखर भुविकास बँक) व जिल्हा सहकारी कृषी ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँकांचे (जिल्हा भुविकास बँका) कर्ज घेतलेल्या शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमाफी करणे तसेच या बँकांच्या मालमत्ता शासनाकडे हस्तांतरीत करुन घेण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग
शासन निर्णय क्रमांक :- एलडीबी-१०१५/ प्र.क्र. २८(शिकाना)/७-स
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
दिनांक :- ०९ नोव्हेंबर, २०२२

संदर्भ:- स.प.व व.वि. शा. नि. क्र. एलडीबी-१०१३/प्र.क्र.६९९/७-स, दिनांक २४.७.२०१५

प्रस्तावना:-

महाराष्ट्र राज्य सहकारी कृषी ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँक मर्या., मुंबई (शिखर भुविकास बँक) व जिल्हा सहकारी कृषी ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँकांचे कामकाज अनेक वर्षापासून ठप्प असल्यामुळे या बँकांबाबत अभ्यास करुन शासनास शिफारस करण्यासाठी दि. १७/१२/२०१४ च्या शासन निर्णयान्वये मा. मंत्री (वित्त, नियोजन व वने) यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रीमंडळ उपसमिती नेमण्यात आली होती. मा. मंत्री (वित्त, नियोजन व वने) यांच्या अध्यक्षतेखालील मंत्रीमंडळ उपसमितीने शासनास सादर केलेल्या अहवालाच्या अनुषंगाने मा. मंत्रीमंडळाच्या मान्यतेने शासनाने दि. २४.०७.२०१५ च्या शा. नि. अन्वये महाराष्ट्र राज्य सहकारी कृषी ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँक मर्या., मुंबई व जिल्हा सहकारी कृषी ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँकांबाबत धोरणात्मक निर्णय घेतलेला आहे. सदर शासन निर्णयानुसार शिखर भुविकास बँक व सर्व जिल्हा भुविकास बँका अवसायनात घेण्यात आल्या आहेत. तसेच थकीत कर्ज वसूली व बँकांच्या मालमत्ता विक्रीमधून बँकांच्या कर्मचाऱ्यांची थकीत देणी अदा करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. त्यानुसार कार्यवाही सुरु आहे.

२. सदर बँका सद्यस्थितीत अवसायनात असल्यामुळे कर्ज वसूलीचे प्रमाण अगदीच नगण्य आहे. थकबाकीदार शेतकऱ्यांनी कर्जाचा भरणा केला नसल्याने त्यांच्या जमिनींवर कर्जाचे बोजे नोंदविण्यात आले आहेत. सदर बोजा नोंदीमुळे संबंधीतांना त्यांच्या जमिनींची विक्री करता येत नाही अथवा राष्ट्रीयकृत बँका, जि.म.स. बँका अथवा तत्सम पतसंरचनेमधून शेतीसाठी कर्जदेखील उपलब्ध होऊ शकत नाही. अशा परिस्थितीमुळे कर्जदार शेतकरी दुहेरी संकटात सापडला आहे. तसेच भुविकास बँकांची कर्ज वसूलीदेखील नगण्य स्वरुपाची असल्याने शासन निर्णयानुसार कर्ज वसूलीतून कर्मचाऱ्यांची देणीसुद्धा देता येत नाहीत. त्यामुळे हक्काची देणी न मिळाल्याने कर्मचारी देखील अडचणीत आहेत. सदर वस्तुस्थिती विचारात घेता, भुविकास बँकांच्या थकबाकीदार कर्जदारांची कर्जमाफी करणे, बँकांच्या कर्मचाऱ्यांची थकीत देणी आणि बँकांच्या मालमत्तांबाबत निर्णय घेण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

शासन निर्णय:-

महाराष्ट्र राज्य सहकारी कृषी ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँक मर्या., मुंबई (शिखर भुविकास बँक) व जिल्हा सहकारी कृषी ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँकांबाबत खालील प्रमाणे निर्णय घेण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

अ) कर्जमाफी :-

I) सद्यस्थितीत राज्यातील २९ जिल्हा भुविकास बँकांकडील ३४७८८ कर्जदारांची थकीत कर्जाची रक्कम (व्याजासह) सुमारे रु. ९६४.१५ कोटी इतकी आहे. सदर संपूर्ण कर्जाची रक्कम

(व्याजासह) माफ करण्यात येत आहे. त्यानुसार सर्व जिल्हा भुविकास बँकांनी त्यांच्याकडील कर्जाच्या रकमा या बँकांकडून शासनास येणे असलेल्या रक्कमेत समायोजीत कराव्यात.

II) सदर कर्जाचे बोजे ज्या थकबाकीदार शेतकऱ्यांच्या जमीनींवर आहेत त्या जमिनींवरील सदर बोजे कमी करण्याबाबत महसूल विभागाशी समन्वय साधून पुढील कार्यवाही संबंधीत जिल्हा भुविकास बँकांच्या अवसायकांनी तातडीने करावी.

ब) <u>कर्मचाऱ्यांची थकीत देणी</u> :-

सदर शा.नि. अन्वये भुविकास बँकांच्या सेवानिवृत्त / कार्यरत / कंत्राटी कर्मचाऱ्यांची एकूण थकीत देणी (उपदान व इतर वैधानिक देणी) अंदाजे रु. २७५.४० कोटी इतकी रक्कम सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, पुणे यांना उपलब्ध करुन देण्यात येत आहेत. त्यानुषंगाने सहकार आयुक्त यांनी भुविकास बँकेच्या संबंधीत कर्मचाऱ्यांना त्यांची थकीत देणी अदा करणेबाबत पुढील आवश्यक ती कार्यवाही करावी.

क) <u>भुविकास बँकांच्या मालमत्ता</u> :-

I) शिखर भुविकास बँक व जिल्हा भुविकास बँकांच्या एकूण ५५ मालमत्तांपैकी सोबतच्या **परिशिष्ट -अ** मध्ये नमूद केलेल्या ४० मालमत्ता संबंधीत अवसायकांनी सहकार आयुक्तांकडे हस्तांतरीत कराव्यात.

II) भुविकास बँकांच्या **परिशिष्ट -ब** मध्ये नमूद ४ मालमत्तांची विक्री प्रक्रीया न्यायप्रविष्ट आहे त्याप्रकरणी न्यायालयाच्या निर्णयानुसार पुढील कार्यवाही संबंधीत अवसायकांनी करावी.

III) **परिशिष्ट -क** मध्ये नमूद उर्वरीत ७ मालमत्ता संबंधीत अवसायकांनी संबंधीत जिल्हाधिकारी यांचेकडे हस्तांतरीत कराव्यात. त्यानुसार सहकार आयुक्त तसेच संबंधीत अवसायक यांनी आवश्यक ती कार्यवाही करावी.

IV) सांगली भुविकास बँकेच्या अवसायनाच्या आदेशास मा. उच्च न्यायालयाने स्थगिती दिलेली आहे. यास्तव सांगली भुविकास बँकेच्या ४ मालमत्तांबाबत मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार अवसायकांनी पुढील आवश्यक ती कार्यवाही करावी.

ड) <u>शिखर भुविकास बँकेची गुंतवणूक</u>:-

शिखर भुविकास बँकेने शासकीय कर्जरोखे व महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेमध्ये मुदत ठेवींमध्ये गुंतवणूक केलेली आहे. सदर शासकीय कर्जरोखे व महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेमधील मुदतठेवींची संपूर्ण रक्कम (व्याजासह) सहकार आयुक्तांकडे हस्तांतरीत करावी. त्यानुषंगाने अवसायक, शिखर भुविकास बँक यांनी पुढील आवश्यक ती कार्यवाही करावी.

तसेच इतर जिल्हा भुविकास बँकांकडील शिल्लक निधी देखील संबंधीत बँकांच्या अवसायकांनी सहकार आयुक्तांकडे हस्तांतरीत करावा.

भुविकास बँकेच्या कर्मचाऱ्यांची संपुर्ण देणी अदा केल्यानंतर सहकार आयुक्तांनी त्यांच्याकडे शिल्लक असणारी रक्कम शासनास जमा करावी.

२. शासन निर्णयातील वरील बाबींचे सनियंत्रण करण्यासाठी सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना प्राधिकृत करण्यात येत आहे. सदर शासन निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी क्षेत्रीय अधिकाऱ्यांना अधिक मार्गदर्शक सूचना देण्याची आवश्यकता असल्यास त्याबाबत सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी त्यांच्या स्तरावरुन परिपत्रकान्वये मार्गदर्शक सूचना निर्गमीत कराव्यात.

३. सदरचा शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्र. ५३२/२०२२/व्यय-२, दिनांक ०७.११.२०२२ अन्वये मिळालेल्या मान्यतेनुसार निर्गमीत करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२२११०९१४११०७५९०२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

SUNIL LAXMANRAO KATHOLE

Digitally signed by SUNIL LAXMANRAO KATHOLE
[illegible] GOVERNMENT OF MAHARASHTRA, [illegible] COOPERATION MARKETING AND TEXTILE DEPARTMENT [illegible]

( सु. ल. काठोळे )
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई-३२
२. मा. उप मुख्यमंत्री यांचे सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई-३२
३. मा. मंत्री (सहकार) यांचे खाजगी सचिव.
४. मा. विधानसभा सदस्य / विधान परिषद सदस्य (सर्व)
५. मा. मुख्य सचिव यांचे उप सचिव.
६. मा. अपर मुख्य सचिव(सहकार व पणन), सहकार पणन व वस्त्रोद्योग विभाग.
७. मा. अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग.
८. मा. प्रधान सचिव (विधी व न्याय), विधी व न्याय विभाग.
९. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१०. अवसायक, महाराष्ट्र राज्य सहकारी कृषी ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँक मर्या., मुंबई १५ ए मोरजी लेन, चौपाटी, मुंबई-४०० ००७
११. मुख्य महाप्रबंधक, राष्ट्रीय कृषी ग्रामीण विकास बँक, ५४ वेलस्ली रोड, शिवाजीनगर, पुणे-५
१२. जिल्हाधिकारी (सर्व)
१३. विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था (सर्व)
१४. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था (सर्व)
१५. अवसायक, जिल्हा सहकारी कृषी ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँक (सांगली भुविकास बँक वगळून सर्व)
१६. जिल्हा व्यवस्थापक, जिल्हा सहकारी कृषी ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँक (सर्व)
१७. निवड नस्ती.